भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र .८१३/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १३/१२/२०१७

## १) सोन्या–चांदीचे दागीने व नगदी पैशाची चोरी:–

दिनांक ११+१२/१२/२०१७ चे २३.०० वाजता ते ०४.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी योगराज डुडेश्वर बनकर वय ४२ वर्ष रा. वळद हे कुंटुबासह त्याचे घरी रात्री झोपले असतांनी कोणीतरी अज्ञात चोरांने मागील दाराची टिचकनी तोडुन आत प्रवेश करून लोखंडी आलमारीतील चांदीच्या ०५ आंगठया ०५ ग्रॅम कि. १५,००/रु, चांदीचे पायल किमती १०००/रु., सोन्याचे कानातील रिंग ०२ ग्रॅम कि. २,०००/रु. ०१ सोन्याची नाकातील फुली ०१,ग्रॅम कि. १०००/रु. व नगदी ४,०००/रु. असा एकुन ९,५००/रु. चा माल व शेजारील ईश्वर बनकर याचे घराचे मागच्या दाराची साखळी काढुन आत प्रवेश करून घरातील गोदरेज आलमारीतील ०१ सोन्याची नथ ०३ ग्रॅम कि. ३,०००/रु., ०१ सोन्याची अंगठी ०४ ग्रॅम कि. ४,०००/रु., सोन्याची नथ दिड ग्रॅम कि. १५,००/रु.,चांदीचे पायल ०२ जोड कि. २,०००/रु. व नगदी ५०००/रु. असा एकुन १५,५००/रु. दोन्ही मिळुन एकुन २५,०००/रु. चा माल चोरून नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली कलम ४५७,३८० भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा~~पोलवा~~ चांदेवार पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत

## २) मुलीचा विनयभंग केल्याने गुन्हा नोंद:–

दिनांक १२/१२/२०१७ चे १०.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी ही शाळेतुन घरी सायकलने जात असतांनी यातील आरोपीने फिर्यादी हिचा पाठलाग करून तिचा विनयभंग केल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन अडयाळ कलम ३५४(ड),(१),३२३ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सतदेवे पोलीस स्टेशन अडयाळ हे करीत आहेत

## ३) अश्लिल शब्दात शिवीगाळ करून जिवाने मारन्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद:–

दिनांक १२/१२/२०१७ चे १४.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादीने आरोपी क्र. १ व आरोपी क्र. २ हे वकील असुन त्यांनी फिर्यादीस सावर्जनिक ठिकाणी मा.प्रथम श्रेणी न्यायालय तुमसर वकीलाचे स्टॉप रूम मध्ये बोलावुन ५०,०००/रु. फिर्यादीला मांगीतले असतांना त्याना पैसे दिले नाही. म्हणुन फिर्यादीस अश्लिल शिवीगाळ करून मारपीट केले व जिवे मारण्याची धमकी दिल्याने, फिर्यादीचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम २९४,३२३, ५०६,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. चिचखेडे पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत.

## ४) मुलाचा मृत्यु :–

दिनांक १२/१२/२०१७ चे ०३.२० वाजता दरम्यान फिर्यादी रमेश श्रावण सेल्लारे वय ४७ वर्ष रा. कोटगाव ता. मौदा जि. नागपुर यास दि. १२/१२/२०१७ ला ०३२० वाजता फोन वरून माहिती मिळाली की, फिर्यादी यांच्या मुलाला सा.रू. भंडारा येथे बेशुध्द अवस्थेत आणले आहे, या माहिती वरून सा.रू. भंडारा येथे येवुन पाहीले असता, डॉक्टरांनी मृत घोषीत केल्याने डॉक्टरी मेमो व फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पो.स्टे. भंडारा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पढील तपास पोउपनी. फटींग पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**५) आमरोड वर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक १२/१२/२०१७ चे १०.३० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील ट्रॅक्टर दांडेगाव येथे आमरोडवर येणा–या जाणा–या वाहुतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अशा स्थितीत ऊभी करून मिळुन आल्याने सर तर्फे फिर्यादी सपोनी. पुसाटे यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन दिघोरी येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. पुसाटे पो.स्टे. दिघोरी हे करीत आहेत.

**६) अवैध दारू/ जुगार अड्डयांवर धाडी . :–**

दिनांक १२/१२/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन कारधा, आंधळगाव व लाखांदुर ,येथील अवैध दारू अड्डयांवर धाडी घालुन एकुण ०५ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन १२ लिटर हातभट्टी दारू किंमती १२००/–रु. व २ लिटर ७०० मिलीलीटर देशी दारू कि. ९००/रु तसेच जुगार कारधा असा एकुन ८३७ /रु असा एकुन २,९३७/रु. चा माल जप्त करण्यात आला.

**७) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक १२/१२/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ११० प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवाशी ०३ तीन सिटर वाहनांवरती ८७ केसेस व ईतर वाहनांवरती २० केसेस करण्यात आलेले आहे.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.